# अक्षरा

(मिश्र कवितासंग्रह - भाग ६)

रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)

मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**अक्षरा** (मिश्र कवितासंग्रह - भाग ६)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : drmangushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२,
कवितांच्या बागेसमोर, ज्योतीनगर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस,
वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : मार्गशीर्ष शु. ३, शके १९४७
रविवार, दि. २३ नोव्हेंबर, २०२५

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, १-एन, सेक्टर ए, एन-१,
सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
भ्रमणध्वनी - ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-988171-2-9

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : **₹ १५०/-**

सर्व रसिकवरांना
सादर समर्पण...

# मनोगत

'अक्षरा' या संग्रहाचं नाव ठरवताना माझ्या मनात एकच विचार होता की माझ्या लेखनाचं मूळच अक्षरांमध्ये आहे. मी कधी देवाला शोधते, कधी स्वतःला; पण प्रत्येक वेळी, माझ्या शोधाची दिशा शब्दांतूनच जाते. माझ्यासाठी अक्षर म्हणजे प्राणवायू. तो थांबला, तर लेखणीही थांबते, आणि मनही. मी जेव्हा लिहिते, तेव्हा शब्दांचा जन्म माझ्या आतल्या नि:शब्दतेतून होतो. ती नि:शब्दता म्हणजेच माझी साधना.

'अक्षरा' लिहिताना मला जाणवलं की शब्द केवळ विचारांचं रूप नसतात; ते भावनांचं अवतार असतात. कधी शब्द रडतात, कधी हसतात, कधी गप्प राहतात. मी फक्त त्यांची श्रोती आहे. या कवितांमध्ये मी अक्षरांशी संवाद साधलाय.

मी त्यांना प्रश्न विचारले – 'तू मला का लिहितोस?' आणि ते उत्तरले 'कारण तुझ्या श्वासात माझं अस्तित्व आहे.' माझ्या आयुष्यातील प्रत्येक टप्प्यावर काही अक्षरांनी मला आधार दिला आहे. कधी पुस्तकाच्या पानावर, कधी मित्राच्या पत्रात, कधी स्वतःच्या कवितेत. अक्षर म्हणजे माझं घर आहे. जिथं मी निश्चिंतपणे स्वतःला मोकळं करते.

'अक्षरा' हा संग्रह म्हणजे माझ्या त्या सर्व संवादांचा ठसा आहे. कधी अक्षर देव झालं, कधी साथीदार, कधी साक्षीदार. या सगळ्या रूपांचं एकत्र दर्शन म्हणजे 'अक्षरा.' प्रत्येक कविता म्हणजे माझ्या लेखनप्रवासातील एक ठिपका आहे. कधी ठळक, कधी धूसर. पण त्या ठिपक्यांनीच माझं आयुष्याचं चित्र तयार झालं. अनेकदा मला वाटतं कविता मी लिहित नाही, ती मला लिहिते. शब्द माझे नसतात, ते मला शोधतात. आणि म्हणून 'अक्षरा' माझ्या लेखनाचा नव्हे, तर माझ्या आत्म्याचा संग्रह आहे.

मी या कवितांत काही शिकवू पाहिलं नाही; मी फक्त सांगू पाहिलं की शब्द जगतात, जर मन जिवंत असेल तर.

माझ्या वाचकाला मी सांगू इच्छिते अक्षरांवर विश्वास ठेवा. ते तुम्हाला कधीच सोडत नाहीत. ते तुम्हाला स्वतःकडे परत आणतात.

'अक्षरा' माझ्या हृदयातून उमटलंय. ते प्रत्येक वाचकाच्या हृदयापर्यंत पोहोचावं हीच माझी प्रार्थना. 'अक्षर हे केवळ लिहिलं जात नाही, ते जगलं जातं.'

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# प्रस्तावना

‘अक्षरा’ या एकाच शब्दात अनंत विश्व सामावलेलं आहे. अक्षर म्हणजे सुरुवात, अक्षर म्हणजे ओळख, अक्षर म्हणजे स्मृती आणि अक्षर म्हणजे अमरत्व. जगातल्या प्रत्येक भावनेचा, प्रत्येक विचाराचा, प्रत्येक श्रद्धेचा आकार शेवटी अक्षरातच बांधला जातो आणि म्हणूनच, जेव्हा डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्या लेखणीतून ‘अक्षरा’ हा संग्रह जन्म घेतो, तेव्हा तो फक्त कवितांचा संग्रह राहत नाही तो एक अक्षरांचा आत्मसंवाद बनतो.

या संग्रहाचं नाव जसं मोहक आहे, तशीच त्याची शैलीही गहिरा आणि चिंतनशील आहे. कवयित्रीने अक्षरांच्या माध्यमातून केवळ सौंदर्य निर्माण केलं नाही, तर अर्थ शोधला आहे. या कवितांत शब्द केवळ लिहिलेले नाहीत; ते जगलेले आहेत. प्रत्येक कविता म्हणजे एक लहानसं विश्व जिथं अक्षरांना प्राण आहे, आणि भावना त्यांचे स्वर आहेत.

‘अक्षरा’मध्ये कवयित्री स्वतःशी बोलते, शब्दांशी वाद घालते, आणि त्या शब्दांतूनच स्वतःला पुन्हा नव्यानं ओळखते. कधी अक्षर तिचं आईसारखं सांत्वन करतं, कधी मित्रासारखं गप्पा मारतं, तर कधी आरशासारखं तिच्या आतल्या मनाचं खरं रूप दाखवतं.

या संग्रहातली प्रत्येक कविता म्हणजे भाषेच्या पलीकडचा अनुभव. शब्द येथे माध्यम नाहीत तेच उद्दिष्ट आहेत. कारण अक्षर हेच तिचं घर आहे, तिचं अस्तित्व आहे, तिचा श्वास आहे. या संग्रहातला सूर अत्यंत आत्मीय आहे. कवयित्री अक्षरांकडे केवळ लेखनाचं साधन म्हणून पाहत नाही; ती त्यांच्याकडे सजीव भावनांप्रमाणे पाहते. तिच्या दृष्टीने अक्षर म्हणजे सृष्टीचं बीज ज्यापासून विचार उगवतात, भावना उमलतात, आणि कवितेचा जन्म होतो.

वाचकाला या कवितांमध्ये एक विलक्षण आत्मीयता जाणवते. कधी अक्षर तिच्यासाठी प्रार्थना होतं, कधी संवाद, कधी निखळ शांतता. या कविता वाचताना मनात एक प्रश्न येतो कविता कोण लिहितं? माणूस की अक्षरं? कवयित्रीच्या लेखणीतून उमटणाऱ्या ओळींमध्ये असं वाटतं अक्षरांनीच कवयित्रीला लिहिलं आहे! विंदा करंदीकरांनी म्हटलं होतं, 'कविता ही शब्दांची प्रार्थना आहे.'

'अक्षरा' या संग्रहात ती प्रार्थना प्रत्येक पानावर ऐकू येते. त्यात नमन आहे, पण नम्रतेने; त्यात विचार आहे, पण विनम्रतेने. या संग्रहातील प्रत्येक कविता सांगते की अक्षर हे केवळ भाषा नाही, ती भावनांची स्मृती आहे. कवयित्रीची शैली अत्यंत सुटसुटीत, पण हृदयाला भिडणारी आहे. ती जड शब्द वापरत नाही; तिच्या ओळींना गेयपणा आहे. त्या वाचताना आपण जणू एखाद्या संथ गाण्यात हरवतो. कविता संपते, पण तिचा प्रतिध्वनी दीर्घकाळ मनात राहतो. या कवितांमध्ये तत्त्वज्ञान आहे, पण ते क्लिष्ट नाही. ते सहज आहे. अगदी दैनंदिन जीवनासारखं. ती अक्षरांतून जीवन बघते. कधी ते विखुरलेलं दिसतं, कधी बांधलेलं, कधी पोकळ, कधी परिपूर्ण. पण प्रत्येक वेळा, ती अक्षरांमधून स्वतःला शोधते. या कवितांतून ती माणसाच्या भावविश्वाचा प्रवास करते. शब्दांपासून अर्थाकडे, अर्थापासून अनुभवाकडे, आणि अनुभवापासून आत्म्याकडे.

'अक्षरा' या संग्रहात शब्द आणि आत्मा यांचं नातं नव्याने उमटतं. या संग्रहातली प्रत्येक कविता स्वतःची ओळख राखते. कधी 'अ' या पहिल्या अक्षरात ती विश्वाचं आरंभ पाहते, तर 'ह' मध्ये जीवनाचा शेवट शोधते. पण त्या दोहोंच्या मधला प्रवासच तिला सर्वाधिक प्रिय आहे कारण तिथंच जगण्याचा अर्थ आहे.

कवयित्रीचा एक विशेष गुण म्हणजे ती शब्दांशी खेळत नाही, ती त्यांना जपते. तिचं लेखन म्हणजे शब्दांची पूजा आहे. तिच्या कवितेतून एक सखोल आदर झळकतो. अक्षरांचा, लेखनाचा, आणि अभिव्यक्तीच्या पवित्रतेचा.

'अक्षरा' हे नाव एक वचन आहे की प्रत्येक शब्दामागे एक भावना आहे आणि प्रत्येक भावनेत एक अक्षर झोपलेलं आहे. या संग्रहाचा वाचक फक्त वाचक राहत नाही; तो सहभागी होतो. वाचताना कुठेतरी आपण स्वतःलाच सापडतो. कारण ही कविता आपल्यावर 'लादली' जात नाही, ती आपल्यात विरघळते. अक्षरांमधून चालताना आपण विचारात पडतो. किती वेळा आपण बोलतो, पण न

बोललेलं काहीतरी राहून जातं? किती वेळा लिहितो, पण मनाचं खरं बोलणं शब्दांत उतरत नाही? आणि तरीही, तीच अक्षरं पुन्हा पुन्हा आपल्याला बोलावतात. हेच 'अक्षरा'चं सामर्थ्य आहे. साहित्यविश्वात हा संग्रह एक मृदू, पण गहिरा झंकार निर्माण करतो. तो सांगतो की जेव्हा शब्द सत्याच्या प्रकाशात उभे राहतात, तेव्हा अक्षर अमर होतं.

'अक्षरा' म्हणजे जीवनाचं शुद्ध आरसपानी रूप. ते वाचताना आपण जाणवतो की शब्दांना आवाज असतो, आणि अक्षरांना आत्मा.

**सौ. श्वेता (स्मिता) राजीव देशपांडे**
नागपूर

# अनुक्रमणिका


१) आधार चांदण्यांचा ... १३
२) फुलपाखरू तिचं मी ... १४
३) वळण असावे
वळणावळणावरती ... १५
४) पंख पसरुनी वाटे मजला ... १६
५) बीज अंकुरे अंकुरे ... १७
६) तुझ्या इना
ह्ये जगणं भकाऽऽस ... १८
७) प्रीतधाम संपूर्ण ... १९
८) प्रिया वधू मी
सख्या तुझी रे ... २०
९) मोरपिसावर का भाळावे ... २१
१०) बावळ्या कथुल्या खुळ्या... २२
११) पैंजणांचा नाद माझ्या ... २३
१२) जळ अवखळ
लाटांच्या नागिणी ... २४
१३) जरी भंगल्या
भिंती घराच्या ... २५
१४) तुझी प्रिय राणी हिरमुसली... २६
१५) नको दटावू आई मजला ... २७
१६) अन् वेणूच्या
सुरात मधुऱ्या ... २८
१७) कृष्ण सख्याशी उन्मन ... २९
१८) झाला बोभाटा ... ३०
१९) शब्दांचं पहावं शब्दोळं ... ३१
२०) काळजात दाटू दे
कणभर माया ... ३२
२१) सांज ढळली ढळली ... ३३
२२) जुळती रे कैसी ही नाती ... ३४
२३) नाते या जन्मीचे ... ३५
२४) ओसंडून वाहो
ही भावमंजूषा ... ३६
२५) नववर्षाच्या स्वागताला ... ३७
२६) प्रीतभाव उन्नेम ... ३८
२७) चूक भूल द्यावी घ्यावी ... ३९
२८) शिवें पार्वती तू कल्याणी ... ४०
२९) माझी सोशिक शेवंती ... ४१
३०) ध्यानी मनी तूच तू ... ४२
३१) शब्द येती सोबतीला ... ४३
३२) फुलाफुलांवर पडोत पाय ... ४४
३३) श्रीरंग माझा आकळे ... ४५
३४) हात तुझा रे धरून जाईल... ४६
३५) तुझे हळवेसे माझे होणे ... ४७
३६) घर गोकुळाचा भास ... ४८
३७) तो चंद्रमा खुशीत ... ४९
३८) हरवून गेली राधा ... ५०
३९) ऋणानुबंधांच्या जुळलेल्या... ५१
४०) वयात येताना... ... ५२
४१) राधा मागणे वारंवार ... ५३
४२) कधीच नाही ना ... ५४
४३) जन्म माझा शब्द वेडा ... ५५
४४) दुधावरची साय ... ५६
४५) स्पर्श लाभू दे मांगल्याचा... ५७
४६) सोबत करते परिस्थिती ही... ५८
४७) वाट माझी वेगळी रे ... ५९
४८) जिथे दुरावला
सखया माझा ... ६०
४९) फुलराण्यांनो सांगा ... ६१

५०) श्री विष्णू परमेशा ... ६२
५१) अशीच पालवी ... ६३
५२) तूच संजीवनी ... ६४
५३) सांगू कसे श्रीरंगा ... ६५
५४) नयनसूख कोणते कळावे ... ६६
५५) प्रियवरा वळून पाहतो का... ६७
५६) प्रिया कृष्णवरा तूच ना.... ६८
५७) तूच साहित्य ईश्वरी ... ६९
५८) दिशा उजळता
ज्योती पसरते ... ७०
५९) वसुंधरा यौवनात ... ७१
६०) संधी मिळेल केंव्हा ... ७२
६१) वाटा जुनाट झाल्या ... ७३
६२) घर वेगळे नकोच सजणा ... ७४
६३) उदित जाहल्या श्रीनारायणा... ७५
६४) जिथे कृष्ण माझा
ही राधाही तेथे ... ७६
६५) सखे तू...
सोनचाफ्याची खणी ... ७७
६६) नवी वाट रोज घ्यावी ... ७८
६७) तुझा हात हाती
सखे राधिके ग ... ७९
६८) कृष्णप्रीतीची रास ... ८०
६९) साथ जन्माची
सात जन्म दे ... ८१
७०) प्रभातवेळी किरणशलाका... ८२



## (१)
## आधार चांदण्यांचा

अंधार रात्रीला का
आधार चांदण्यांचा
लुकलूक दिवे ते दूर
का तेज मागण्याचा

कोणीतरी असावे
अगदी जरीही दूर
दाटून मायेचा ये
त्याच्या उरात पूर

आहे कुणीतरी हो
आपुले जगात कोठे
देऊन साथ जाती
ऐसे विचार मोठे

का असतो समय नेहमी
आपुला सदा समान
उत्कर्ष होत जातो
कधी खोल गर्त जाण

पडत्या विपत्ती समयी
वाटे जीवा दिलासा
तो आपला जवळचा
नको कोणता खुलासा

दि.०८/१२/२०२४
रात्री १०.५३ वा.



## (२)
## फुलपाखरू तिचं मी

हे कोऽऽऽण आलं
गोड फुलपाखरू
माझ्यासारखेच कसे
चाले बघा तुरुतुरु

रंग किती छान छान
पंख त्याचे मोठे पान
उन्हामध्ये खाली वेडे
जमिनीला लावे कान

माझे डोके हलविता
त्याचे डोके हलते
मी जरासे वळताना
तेही कसे वळते

जिथे जिथे जाईन मी
संगे तिथे येते ते
रंग नवे नवे किती
अंगावर घेते ते

ते मला की आवडते
आईला मी आवडे
फुलपाखरू तिचं मी
पापा घेत बडबडे
पापा घेत बडबडे

दि.०९/१२/२०२४
दुपारी १२.३२ वा.

**(३)**

## वळण असावे वळणावळणावरती

वळणावरती थांबायाची
वेळ कधीतरी येते
जरा विसावा हलका हलका
जीवन घेऊन जाते

कधी कुणाची वाट पाहता
थकून डोळे जाती
कधी आपुले कुणी भेटता
हासू गीतही गाती


कधी कुणाचे चुकले काही
म्हणून शिक्षा कोणा
कधी निवृत्ती घेऊन मनही
मागते भिक्षा कोणा

सरळ वाटते चाले जीवन
तैसे कैसे घडणे
एक अनामिक वळण अनोखे
वाटेवरती पडणे

तिथे वळावे की सांभाळावे
स्वतःस एकट्याने
प्रवास वाटे सुखकर होईल
होता तो दुकट्याने

म्हणून वाटते वळण असावे
वळणावळणावरती
जरा वळावे काही कळावे
मनास यावी भरती

दि.१०/१२/२०२४
रात्री १०.४३ वा.



## (४)
## पंख पसरुनी वाटे मजला

पंख पसरुनी वाटे मजला
कधी झेपावे नभात
विसरून साऱ्या चिंता जावे
आनंदी गावात

हलक्या हलक्या मंद हवेच्या
झुळुकांना झेलावे
श्वास मोकळे आस नवेल्या
इंद्रधनू पेलावे

होत नव्याने मेघडंबरी
नक्षी अशी रेखावी
वाटेवरती फुले कळ्यांची
रांगोळी आखावी

सात रंग ना असतील अगणित
आत रसायन ऐसे
रोज नव्याने एक जमावे
रंगाळे मन तैसे

दिशा कोणत्या कशा भराव्या
सकारातुनी वाटा
आनंदाचे दान देणाऱ्या
कसला तोटा घाटा

दि.११/१२/२०२४
रात्री १०.५७ वा.



**(५)**

## बीज अंकुरे अंकुरे

बीज अंकुरे अंकुरे
आस उभरून येता
आत भुईच्या कुशीत
रोप तरारून जाता


काय सांगते ती माती
जप बाळा नातीगोती
पानं फुलं कळ्या शाखा
भार कधीही ना होती

होत जाईल विस्तार
मुळं माझ्याशी जोडली
जर असतील सदा
कुणी कितीही तोडली

पुन्हा होईन मी माता
संजीवन स्तन्य देता
पुन्हा पुन्हा नवनवी
संतती की जन्म घेता

आत खोल रुजलेले
धागे स्नेह भरलेले
बंध घट्ट अंतरीचे
शब्दातीत ठरलेले

दि.१२/१२/२०२४
सकाळी ०९.३८ वा.



## (६)
## तुझ्या इना ह्ये जगणं भकाऽऽस

समदं मळभ दूर सरलं ग
रानारानात बीज पेरलं ग
आता सपान डोळा उरलं ग
लई सुखानं घर भरलं ग

जरासा म्याऽऽऽ टेकलोय हितं
झाडाच्या बुंध्या लगतं
संगतीस कारभारणी रंगतं
चित्र माझ्या मनाजोगतं

सकाळधरणं ही राबतीया
घरादाराला घट्ट सांधतीया
जल्माची चव की रांधतीया
साथ साताची कानी सांगतीया

मनामंदी पालवी फुटतीया
खुशी आपसुक जिवा जुटतीया
माती तरारून उठतीया
थेट काळीज नभ गाठतीया

अश्शी उन्हाची सावली तू ग
माझ्या पोरांची माऊली तू ग
रान लक्ष्मी पावली तू ग
झेलण्या संकट धावली तू ग

तुझ्या डोळ्यात नवीच आस
न्हाई कष्टाची सोडली तू कास
तुझ्या कुशीत मायेची रास
तुझ्या इना ह्ये जगणं भकास
तुझ्या इना ह्ये जगणं भकीीस

दि.१३/१२/२०२४
सकाळी ०७.३९ वा.



## (७)
## प्रीतधाम संपूर्ण

एकरूप तू एकतान मी
एक आत्म बघ झालो
ऐक राजसा श्याममोहना
श्रीरंगी रे न्हालो


कोण म्हणेल ही प्रीती इथली
नाही नाही केवळ
स्वर्गामधले सूर जुळाले
गीत विशुद्ध हे निव्वळ

मी तू जवळी असता माधव
भान हरपुनी जाते
मिटती लोचन कलिका अलगद
मौन बोलूनी जाते

कसे सांगावे या विश्वाला
विश्वरूप तू माझे
कैसी राधा म्हणून का पुसता
कृष्णरुप हो माझे

युगायुगांच्या कथा सांगतील
प्रेम अनोखे अपूर्व
राधाकृष्ण ना कधी वेगळे
प्रीतधाम संपूर्ण

दि.१४/१२/२०२४
सकाळी ०८.०४ वा.



## (८)
## प्रिया वधू मी सख्या तुझी रे

प्रिया वधू मी सख्या तुझी रे
नटले सजले आहे
दर्पणी पाहते रूप निखरले
लज्जेत मी भिजले आहे

तुला पाहते गाली हसते
मनात लाडिक आस
आता तुझ्या नावाने येतील
जातील माझे श्वास

शालू खुलला मेंदी रंगली
गजरा फुलला आहे
साजन माझा प्रीत बावरा
मजवर भुलला आहे

नजरेमध्ये किती स्वप्नांची
माळ ओवली आहे
वाट प्रिया तू दे ना फुलांची
सजनी कोवळी आहे

तुझ्यासवे मी सुख भरलेले
चित्र पाहते आहे
गुंग सदा मी दंग प्रिया रे
तव रंगी राहते आहे

दि.१५/१२/२०२४
रात्री ११.२३ वा.




## (९)
## मोरपिसावर का भाळावे

मोरपिसारा रंगफुलोरा
ढंग वेगळा आहे
तुरा मोहरा रूप भोवरा
छंद वेगळा आहे

नभ भरताना मन भरते अन
थुई थुई नाचून जातो
वर्षाऋतूंची आळवणी मग
गीत नाचरे गातो

नीलकंठ मी शिव शंभूचा
स्पर्श गळ्याला झाला
तेंव्हा कोठून स्वर्गामधुनी
रंग पिसावर आला

नजर वाट पाहते पावसी
आस मनाची वेडी
मोरपिसावर का भाळावे
प्रियवर त्याने छेडी

असेच माझे मनही नाचे
मोर होता प्रियाशी
मिळेल जेंव्हा सख्या प्रेमाची
वर्षा खासमखाशी

दि.१६/१२/२०२४
रात्री १०.४८ वा.



## (१०)
## बावळ्या कथुल्या खुळ्या

साद मनाची ऐक तू
ऐक राजा भाव रे
बघ दिसे तुजला तुझ्यातच
कोरले मज नाव रे

प्रेम काही आगळे हे
आत्मरूपाची प्रचीती
तू जरा डोकाव आतच
माझी तुज मिळणार रीती

जोडलेले बंध कसले
जुळती ते तर ईश्वरी
हो कृपा त्याची रे जेंव्हा
साथ लाभे वल्लरी

भावनांचे सूर जुळता
गीत उमटून ये असे
साथ देते बासुरी अन
श्रीहरीचे वेध ते

येऊ दे जुळुनी मनीच्या
हळव्या तारा आपुल्या
चालू दे या प्रीतभरल्या
बावळ्या कथुल्या खुळ्या

दि.१७/१२/२०२४
रात्री ११.२९ वा.



## (११)
## पैंजणांचा नाद माझ्या

पैंजणांचा नाद माझ्या ऐक राजा
काय सांगतात चंचल घुंगरू
चालता मी चालतात तेही ना
छन्? छना छन्? स्वर होई बघ सुरू

पावलांच्या सोडतात ज्या खुणा
घुंगरांच्याही असे काही मना
का विसरतो तू तुला नादात या
सांग ना माझ्या प्रिया रे साजणा

आले तुझ्या घरात ज्या दिनी सख्या
वेध घेत तू सदा मागे तसा
आजही मला हवे हवे तुझे
मनविण्या यावास माझ्या राजसा

दिनभरी आवाज मंद होतसे
रातीला किती ठळक ते बोलती
नूपुरांच्या संगतीने चालणे
गोडव्यांचे नाद ऐसे घोळती

तू पुन्हा देशील नक्षीदार ते
उपहार मजसी पैंजणांचे देखणे
मी पुन्हा प्रीतीत जपल्या ज्या खुणा
त्या मधुरशा आठवांना रेखणे

दि.१८/१२/२०२४
रात्री १०.४९ वा.



## (१२)
## जळ अवखळ लाटांच्या नागिणी

जपून जपून जपून टाक पावला
जीव सखे तुझ्यामधे गुंतला
काय भरवसा अथांग सागरा
धीर मज मनीचा प्रिये संपला

ती घसरडी वाट जप जरा ग तू
तेथ निसटती झणी जाण तू
खडक चिकचिके सारे जाहले
घट्ट पाय रोवुनी ग थांब तू

जळ अवखळ लाटांच्या नागिणी
सळसळ करुनी निघतील धावुनी
येतील सरसर सर सरसावुनी
घे अंदाजा नीट पाहुनी

तूऽऽ ओली चिंब चिंब जाहली
मोहिशी तू मज मना ग भिजलेली
अजूनही तिथेच आहे थांबलो
दृष्टी ही कधीऽऽचीच थबकली

पण वाटे काळजी तू धुंद ग
फुलपाखरू तैसी स्वच्छंद ग
ओढ लावी मजसी तव सुगंध ग
कोशी तुझ्या प्रीतीचा मी बंद ग

दि.१९/१२/२०२४
रात्री ११.२६ वा.



## (१३)
## जरी भंगल्या भिंती घराच्या

जरी भंगल्या भिंती घराच्या
हासणारे बाल्य दे
आठवांच्या त्या झरोक्या
अन्? जिव्हाळी पाल्य दे

दार असले बंद जरीही
आत जाण्या छंद दे
गावच्या मातीतला मज
तू सदाची गंध दे

देवळीत ठेवलेल्या
पणतीचा उजेड मी
दारावरल्या ओसरीचा
आसरा नि वेड मी


अंगणात तुळशीच्या
नाचलेले दान ते
आजही मनात हिरवे
पिंपळाचे पान ते

खापराच्या आतले
थंड झरे तृप्तता
कानगुज सांगताना
लपवलेली गुप्तता

रांजणात डोकावीत
पाहिलेली रूपसी
आरशाची ना तमा नि
आस भरली खूपसी

दे पुन्हा दे मला
तो काळ देवा परतुनी
गेला आहे आजही जो
हातातूनी हरवुनी

दि.२०/१२/२०२४
सकाळी ०९.०९.वा.



## (१४)
## तुझी प्रिय राणी हिरमुसली

अशी मी वाट पाहुनी
थकून जाते प्रिया किती रे
तुला कळणार कधी वेड्या
माझी ही असीम प्रीती रे

दाराशी खिळते ही दृष्टी
मन तुझ्या वाटेवर लागे
मी जाते हरवुनी मजला
न कळते का अशी मी वागे

कळी सुकते मी उगा बसते
खिन्नता घेरुनी जाते
मी तुझ्या आठवांच्याच
गावी नित ही फिरूनी येते

कसे सांगू जीवा लागी
अशी होते घालमेल
समोरी तू असावास
साधला जाई ताळमेळ

अशी ही ओढ का लागे
कसे समजावू मी तुजला
जरा समजून तू घ्यावे
प्रिया ना सांगता मजला

पहा डोळ्यात तू माझ्या
ही विरही आस आसुसली
जरा भेटून पाहून जा
तुझी प्रिय राणी हिरमुसली

दि.२१/१२/२०२४
रात्री ०८.५० वा.

## (१५)
## नको दटावू आई मजला

नको दटावू आई मजला
मीच दटावीन आज तुला
का ग करतेस इतकी काळजी
सांग आधी तू सांग मला

कितीदा पुसशील खाल्लेस का  ते
कुठे चालले विचारतेस
काय तुला जाणून हवे ते
डोळेही मग वटारतेस

सांभाळून जा, हे कर ते कर
लहान का ग आता मी
किती कावतेस नको खाऊ म्हणतेस
बाहेरचे काही खाता मी

तुझ्या मायेचे कळतंच नाही
मला घट्ट बांधतेस तू
तुझ्याचसाठी बाळा सारे
पुन्हा पुन्हा सांगतेस तू

कळते सारे मला सांगते
ऐक आता तू आई ग
नकोच माझ्या मागे लागू
शहाणी माझी आई ग

दि.२२/१२/२०२४
सकाळी ०८.४६ वा.



## (१६)
## अन् वेणूच्या सुरात मधुऱ्या

तू वाजव मुरली मुरलीधरा
ते सूर स्वर्गातील येती धरा
मज मनी लहरी उठती कैशा
मज ओढ जाणवे होय त्वरा

कुठले अन कैसे नाते रे
अनुबंध कोणते ना जाणे
देहाच्या पलीकडले काही
हे आत्मसूर मानस गाणे

जगताला वाटे प्रीत कथा
मज वाटे निरंतरची धारा
तो हळूच कुजबुजतो आहे
वृंदावनातील वारा

इथल्या पाना फुलात राधा
श्याम डोलतो आहे
अन वेणूच्या सुरात मधुऱ्या
प्रीत बोलतो आहे

किती काळचे मीलन आपुले
किती वेळाची भेट
राधाकृष्ण हे प्रीतरसायन
कवेत घ्यावे थेट

मग जी मिळते प्रीतप्रेरणा
अतुल्य आहे नाम
राधे राधे कुणी म्हणा की
म्हणा हो राधेश्याम

दि.२३/१२/२०२४
सकाळी ०७.५३ वा.




## (१७)
## कृष्ण सख्याशी उन्मन

राधेश्याम मुरारी
तुझी आस असे न्यारी
युगे लोटती अनंत
तुझे नाम जीवा तारी

तुझ्यापायी वाहिलेले
पंचप्राण राहिलेले
राधाकृष्ण प्रीतरंग
जगताने पाहिलेले

लोचनात चित्र तुझे
वेणू स्वर कानी गाजे
कुणी हृदय ऐकता
कृष्ण कृष्ण ऐसे वाजे

छवी मनमोहनाची
भावरीत जीवनाची
उमटून ये सहजी
हास्य लकेर ओठीची

मोरपीस माझे मन
कृष्णमय कण कण
राधा नोहे राधा आता
कृष्ण सख्याशी उन्मन

दि.२४/१२/२०२४
पहाटे ०५.२२ वा.

## (१८)
## झाला बोभाटा

झाला बोभाटा, झाला बोभाटा
वाटंला फुटला फाटा
आंबट चिंबट खातीया जिभली
पर गोडानं अंगावर काटा

आता माणसाला माणूस वळखत न्हाय
भेटून व्हतोया का घाटा
हातात आलंया वीतभर यंतर
त्याच्यावर समदी भेटा

काम जर असंल तर कुणी बी बसंल
माणुसकीला कुठं व गाठा
साधून घ्यायाला मतलब आपला
तळवं गाढवाचं चाटा

कसली धडा न बुडाची स्पर्धा
दुसऱ्याचे पंख की छाटा
सरलं न काम बिम
जलम दात्याला टाटा

वाकं ना कुणाच्या पुढ्यात कुणी
मनात ऱ्हातोया ताठा
फुकटचे तोरे यसनाचे वारे
जगण्यात घाणीचा साठा

झाला बोभाटा, झाला बोभाटा
सुखात साऱ्यांचा वाटा
दिसंना कुणा बी
डोळ्यात आसवांचा साठा

दि.२५/१२/२०२४
रात्री ०९.३९ वा.

## (१९)
## शब्दांचं पहावं शब्दोळं

गाठ मारून होतंय गाठोडं
वाट लावून करणं वाटोळं
वेटोळ्या वेटोळ्यांचं वेटोळं
दाटून येतंय ते दाटोळं

काट काट काटतंय काटोळं
झोपायला लागतंय खाटोळं
पाण्यात चाटुंचं चाटोळं
काय काय छाटतंय छाटोळं

जाता जाईना जातोळं
दात्र्या दात्र्यांचं दातोळं
नात्या नात्यांचा गुंता नातोळं
पातळ पातळ पातोळं

फाटकं तुटकं फाटोळं
बेटा बेटांची गर्दी बेटोळं
माती माती न ढेकळं मातोळं
गाढवाचं लाथांचं लाथोळं

अशा शब्दांचं पहावं शब्दोळं
मोहा मोहाचं पडतंय मोहोळं
भावभावनांचं भावनिक भावोळं
किती जल्मांचं जगणं जगोळं

दि.२६/१२/२०२४
रात्री १०.४३ वा.



## (२०)
## काळजात दाटू दे कणभर माया

रूप वासुदेवाचं असलं तरी बी
भूक पोटाची मोठ्ठी हाय
दान पदरात माळव्याचं ताज्या
आज बिगीनं टाक ग माय

आता न राहिलं हक्काचं घर
ना अंगण  ना गावकुस फार
गेलेल्या पितरांना कोण जुमानील
असलेल्यांना परकं दार

पूर्वजांच्या उद्धारासाठी
वासुदेव गातो उद्धार गीत
पसा पसा दानाची त्याला
रामाच्या पारी भारतीय रीत

आता न पोषाख ना आतला माणूस
कुणाला न कुणाचा खरंच मागमूस
नुसती नात्यात गावात निसर्गात
हटवादानं नाऽऽसधूऽऽस

उभाय मी म्होऱ्यात तुझ्या
सुखाचा शबुत कानावर द्याया
वासुदेव वासुदेव वासुदेव आला
काळजात दाटू दे कणभर माया

दि.२७/१२/२०२४
रात्री ११.४७ वा.



## (२१)
## सांज ढळली ढळली

सांज ढळली ढळली
रात सळसळली सळसळली
तिथं पल्याड कोण जागं
दिस नागीण वळवळली वळवळली

ढवळ्या ये र ये दोस्ता माझ्या
सोनकड्या घे शिंगात तुझ्या
खांदा वशिंड पिळदार बाणा
संग चालशील सदा रं राजा

कुणी सांडलंय केशर पोतं
देवा सुरव्याचं नभी गणगोतं
कसं टेकलंय थकून बिंब
रात व्हणार अंधारचिंब

कोण जागतंय रातभर हिथं
तांबडं फुटंल पूर्वला तिथं
एक पान जाय पलटुन कसं
काळ काळाचं साम्राज्य जिथं

चल चल घरला धरू रं आसरा
कारभारणीचा मुखडा हासरा
वाट पहात राहतोया गुपचूप
माझ्या घराचा सोनाळ उंबरा

दि.२८/१२/२०२४
रात्री ०९.३४ वा.



## (२२)
## जुळती रे कैसी ही नाती

सांग वेड्या मोगऱ्याला
दरवळू नको सांजसमयी
भेटीलागी आस जीवा
कळवळू नको शांत समयी

तीऽऽ तिथे बघ दूर आहे
पापणीला पूर आहे
भावनांनी जड झाला
आज माझा ऊर आहे

तू असा दिसलास कोठे
गंध कोशी भासते ती
तुज आडूनी मोहिनीशी
प्रियतमा मम हासते की

मी अनावर भान नाही
ओळखीचे सूर काही
त्या तिथे तू दूरदेशी
जळती पणती एक पाही

आसवांचे थेम्बमोती
ओघळून सरितेस जाती
सागराच्या ओढीलागी
जुळती रे कैसी ही नाती

दि.२९/१२/२०२४
रतेय ०९.२१ वा.



## (२३)
## नाते या जन्मीचे

तुझे नि माझे नाते कसले
कुठून जुळल्या तारा
वाहत आली स्वर्गामधुनी
अनुबंधांची धारा

स्नेह कोण साठवून ठेवे
कोण मांडतो हिशोबा
कुठले संचित पदरी पडते
कळते कधी ना तोबा

असंख्य जीवांमधून येती
दोन जीव समरसण्या
या नात्याला विश्वासाची
दोर द्यावी दृढ कसण्या

नियमित व्हावे सिंचन त्यावर
प्रीतजलाचे मधुरम्?
नाते जाईल गोड सुखाची
वाट चालत सुदूरम्?

मानून घ्यावे समजून उमजून
आपुले गतजन्मीचे
बंध म्हणून हे एकसंध हो
नाते या जन्मीचे

दि.३०/१२/२०२४
रात्री १०.३२ वा.

## (२४)
## ओसंडून वाहो ही भावमंजूषा

दिस शेवटाचा नित्य गोड व्हावा ।
म्हणून चालला, उठाठेवा ।।

किती भोगीयले दुःख नि वेदना ।
जपून ठेवीन, संवेदना ।।

कसे मी मांडावे हिशेब नि ताळे ।
काय मेळविले, काय गमावले ।।

जे जे आले दुःख पदरात वेचू ।
सुखा कवटाळून, मोदभरे नाचू ।।

काय मी मागावे संवत्सर संपता ।
गोड व्हावी देवा, आरंभ सांगता ।।

नव्या दिसासाठी नवी आशा उषा ।
ओसंडून वाहो ही भावमंजूषा ।।

दि.३१/१२/२०२४
रात्री ०७.५७ वा.



(२५)

## नववर्षाच्या स्वागताला

नववर्षाच्या स्वागताला
पुजू या गणराजाला
कमलासनी बैसला गणु अन
सेवक गजराज हो झाला

आद्यपूजेचा मान तयाचा
देवही सगळे भजती
या गणराया व्हावे विराजित
विघ्ने दूर सरती

रिद्धी सिद्धीचे स्वामी आपण
शुभंकराचे धनी
पार्वतीनंदन बाळ गजानन
विश्व झुकते चरणी


धूप दीप नैवेद्याची
वेळ आरतीची
द्यावी बुद्धी मती ही शुद्धी
वाणी भारतीची

संकट हरुनी दुरिते तारूनी
काळ सुखे जावा
सकळ सिद्धी कार्याचा सुफळ हा
आशीष हो द्यावा

नवसंवत्सर आनंदाचे
आणि सुखाचे जावो
यश गुण कीर्ती पसरून सुरभित
दहा दिशी राहो

काव्य स्फुरावे कवण झरावे
प्रतिभा उल्हास
साहित्याची नित्यनिर्मिती
जिवास प्रल्हाद

दि.०१/०१/२०२५
सकाळी ०९.३१ वा.



## (२६)
## **प्रीतभाव उन्नेम**

तू माझा मी तुझी मोहना
काय भारावणे
सूर एक मुरलीचा छेडून
दंग त्यात राहणे

कुंजवनातील लतिका नाजूक
पुष्पवल्ली डोलती
शब्देविण ही फुले पाकळी
रोमरोम बोलती

मोरपिसाच्या तलम चक्षुने
रतीमदनाचा नेम
मिटून लोचने चित्र उभे जे
प्रीतभाव उन्नेम

गुंग राहते राधा आणिक
गुंग रंग श्रीरंग
सप्तसुरांच्या अनवट श्रुतीने
रोमांचित निज अंग

कसे कोण जाणेल अनामिक
भाव युगांचे जपले
केवळ क्षणभर सहवासाने
श्वास गंध जे टिपले

दि.०२/०१/२०२५
रात्री ११.४३ वा.

## (२७)
## चूक भूल द्यावी घ्यावी

चूक भूल द्यावी घ्यावी
ही जगण्याची रीत व्हावी
किती कुणाच्या चुका पहावया
विसरून जाता जीत व्हावी

नवी नव्याने उगवे प्रभात ही
रोज नव्याने ढळते सांज
राहू द्यावेत काही प्रश्न
उत्तराविना तसेच वांझ

जशी उमलतील फुले कोवळी
तशी कोवळी मने फुलावी
एक स्वीकाराची हळवी
गालावरती खळी खुलावी

हास्यामधले झरो चांदणे
आनंदाची वर्षा व्हावी
प्रसन्न आभा प्रसन्न मुद्रा
मरगळ सारी विरून जावी

म्हणा करावी क्षमा तुम्ही हो
चुकले असले काही तर
इतरांच्याही दोष चुकांना
पोटात द्यावे माफी घर

पुन्हा फिरावे फेर धरावे
नव्या नव्याने जगण्याचे
कशास घ्यावे कष्ट अपार हे
अवगुण सारे गणण्याचे

दि.०४/०१/२०२५
रात्री ०९.२१ वा.




## (२८)
## शिवें पार्वती तू कल्याणी

शिवें पार्वती तू कल्याणी
शिवशंभूची तूच स्वामिनी
गतजन्मीची सती मानिनी
शंकराची आत्मरागिणी

आत्मलिंग मज तूच साथी ग
शिवलिंगाचे तू सामर्थ्य
शक्तीस्वरूपा तू अभिरूपा
तू शब्दस्वर तूच समर्थ्य

आदि अनादी कसला प्रश्न
सदानंदाचा तू आनंद
उदो उदोकारातून गर्जे
माया विश्व स्वच्छंद

तुझ्या संगती परम अर्थ हा
जगज्जननी तू जगतार्थ हा
तूच समाधी पुण्य निधी मज
सदाचार श्रुतीस्मृती स्मार्त हा

एकजीव एकरूप स्वरूपा
दोघे न भिन्न अभिन्न संधता
मुक्त अनाकलनीय विमुक्ती
तरीही आपुली स्वयंबंधता

दि.०३/०१/२०२५
सकाळी ०९.३७ वा.



## (२९)
## माझी सोशिक शेवंती

शेवंतीच्या रानामंदी राबती शेवंती
माझी लाडकी शेवंती.....
शेवंतीच्या फुलण्यानं सपान फुललं
माझी खुलली शेवंती.....


रगताचं पाणी केलं, घाम मोती गाळलं
मासोमासी तिच्यासाठी जीवाला ह्या जाळलं
समदं कसं येळेवर जवा गेलं पाळलं
तवा कुठं तरारून आलीया शेवंती
माझी हसली शेवंती.....

रंग गोरापान तिचा मऊ मऊशार कळ्या
गालावर खुलाव्यात खळ्या तशा पाकळ्या
आल्या सया आया बाया बघायाला ठाकल्या
येचायला वटीमंदी बघा कशा वाकल्या
हासलीया गालामंदी तशी माझी शेवंती
घरची ही लक्ष्मी माझी गुणी शेवंती

तिच्या बहराला तरी ऋतू यावा लागतो
ऊन पाणी वारा सारा तिला प्यावा लागतो
हिच्या खुलण्याला माझी स्वारी फक्त दाराशी
एक हसू माझ्या गाली एक तिच्या उराशी
कवटाळूनिया घ्यावी अशी माझी शेवंती
घरातली पत माझी लाडकी ही शेवंती

रान आज डवरलं धन मोठ्ठं देईल
घरदार माझं समदं सुगंधात न्हाईल
हिला दरवळण्याला कारण ना काही
कितीतरी कष्ट घरधणीन माझी साही
म्हणूनच काळजात राहतीया येडी
ग्वाड ग्वाड वाटती तिच्या पिरतीची बेडी
आजबी मरतोया तिच्यावर गडी
ह्ये तिच्यावर गडी...
मिठीमंदी बंदी माझी सोशिक शेवंती
माझी कोमल शेवंती....

दि.०५/०१/२०२
०३/११, २३:३०




## (३०)
## ध्यानी मनी तूच तू

ध्यानी मनी तूच तू रे
मोहनाची जादू ही रे
नाही सखे राधिके ग
तूच माझी मोहिनी गे

रंग किती देतसी तू
सांग अनंगासवे
दंग श्रीरंग खरा
राधाराणी तुजसवे

सूर तूच छेडीशी
स्वर्ग धून वाजते
प्रीत तुझी माझी प्रिये
त्रिलोकात गाजते

देखता तुला सख्या
रोमरोम रोमतो
पाहता तुला प्रिये
श्याम स्वतः मोहतो

मिटते लोचनास मी
तूच जवळी भासतो
मिटून घेत पाकळी
चंद्र नयनी हासतो

ध्यानी मनी तूच तू ग
जीवनास आस तू
राधे राधे बोलताच
श्याम श्याम भास तू

दि.०६/०१/२०२५.
रात्री ०९.२३ वा.



## (३१)
## शब्द येती सोबतीला

शब्द येती सोबतीला
अर्थ संगतीला
भाव येती काळजाला
ठाव रंगतीला


लाज उमटू येत जाते
हासू गाली राहता
ती खळी का राजते मग
राजसासी पाहता

लोचनांची पाखरे का
भिरभिरु रानी वनी
स्वप्नं होते इंद्रधनुचे
गंध जातो काननी

का तनुवर फुलती काटे
का फुलेही बोचती
का सुखाच्या वाटेवरती
दुःख भारे टोचती

शब्द येती शब्द जाती
शब्द सारे निःशब्द
शब्द म्हणजे गलबला अन्?
शब्द शब्द नुसते शब्द

दि.०७/०१/२०२५
रात्री १०.२१ वा.



## (३२)
## फुलाफुलांवर पडोत पाय

असे वाहणे असे उगवणे असे
लकाकणे जमेल काय
असे राहणे असेच जगणे
असे चमकणे जमेल काय


कुणी कुणाच्या साठी झुरणे
विनाकारणी जमेल काय
जळून कापूर जैसे उरणे
तरीही हासणे जमेल काय

चंदन संपून जाते उगळून
तरीही सुगंधी जीवन काय
दवबिंदूंचे क्षणात मोती
त्यात मना हे अडकून जाय

रंग कोणते आले नशिबी
सुरंगीत सूर नाहतील काय
ढगात गोळा थेंब धरेवर
नद्या खळखळू वाहतील काय

काटे कितीही असतील तरीही
फुलाफुलांवर पडोत पाय
दुःख मनीचे हवेत वेडे
झणी उडूनी जाईल काय

दि.०८/०१/२०२५
रात्री १०.३० वा.



(३३)

## श्रीरंग माझा आकळे

पारदर्शी काळजाची
प्रीत बिंबली पहा
त्या तिथे निशेस
शशीने अलगदशी चुंबीली पहा

त्या नदीच्या ओघळातून
वाहणाऱ्या झुळझुळया
लहरी उठती आणि वाटती जणू
जलराणीच्या कळ्या

तू नभातून केशराचे
कोण फुलवी हो मळे
रंग सारे सांडताना....
श्रीरंग माझा आकळे

त्या भुईच्या गर्भकोशी
बीज दडलेले असे
एक रेणू एक अणू
विश्व घडलेले दिसे

तेज बिंबातील शक्ती
अंगअंगी नांदते
आत एक दिव्य वास
संग संगी सांगते

दि. ०९/०१/२०२५
रात्री ११.१५ वा.



## (३४)
## हात तुझा रे धरून जाईल

झुरून जाईल तुझी सखी रे
संपली तरी उरून जाईल
तूच जर कधी अव्हेरले तर
मरणालागी स्मरून जाईल

क्षण प्रेमाचे तुझे आठवून
जन्मोजन्मी तरून जाईल
जीव सोडला तरीही संचित
तुझ्याच नावे करून जाईल

कधी सुन्या अंधाऱ्या राती
प्रीतचांदणे झरून जाईल
आले संकट झेलून घेता
चक्रची सारे फिरून जाईल

रिक्त होत जरी गेले कधी तरी
तुझी मी झोळी भरून जाईल
वाहत वाहत कालौघातून
हाक दिलीस तर ठरून जाईल

असे तुझे रे जग स्वप्नीले
क्षणाक्षणाला करून जाईल
सावलीरूपे येत साथीशी
हात तुझा रे धरून जाईल

दि.१०/०१/२०२५
सकाळी ०८.१० वा.



## (३५)
## तुझे हळवेसे माझे होणे

कातर कातर अधरांवरती
साजन स्पर्शाची शेवंती
थरथर नवथर मीलन राती
बुजरी सखी का ती लाजवंती


नव्या नवेल्या अधीर वेळा
वाट पाहणे जीवास चाळा
नजर भेटली तरीही वाटे
साजन जवळी जवळी आला

श्वासांवरती गंध पेरणे
मंद चांदणे भुई ओघळणे
नभात पाहून निशाकराला
उगाच वसुधेने पाघळणे

वाऱ्यावती जरी आली की
हाक कुणा दुसऱ्यास मारली
आवाजाच्या हव्या स्वराने
प्रिया तुझी बघ काळीज हरली

तुझे चालणे तुझे बोलणे
सहवासाने जीवन कळणे
हळूच कानी वदला सखया
तुझे हळवेसे माझे होणे

दि.११/०१/२०२५
सकाळी ०९.४२ वा.



(३६)

## घर गोकुळाचा भास

म्हायेराला आलेलं हे
लेकीबाळीचं रुपडं
संसाराच्या येलीवर
फूल फुललेलं गोड

तिच्या आनंदाला सीमा
सांगा कुणी हो बांधावी
माया जीवाच्या जीवाची
रोज नव्यानं सांधावी

तिचं हासणं ते गाणं
अंगणात खिदळणं
बाळराजासंग तिचं
बाळ होऊन खेळणं

खुळखुळा झांज वाजं
खुदूखुदु स्वर गाजं
आजी इसरती समदं
नातासाठी कामकाज

तेल मालिश धुपारे
कवळे उन्हं आन वारे
तान्हुल्याच्या खोड्यामंदी
या हो दंग व्हा ना सारे


घरादाराला बांधून
जाय आता की रांगून
बोबड्या त्या बोलामंदी
कृष्ण माया दे सांगून

यावं फिरून जगणं
तसं बाळा तुझं येणं
माझ्या लेकीच्या मायेचं
देव किरपेचं लेणं

किती दिसाचा पाहुणा
आजोळाचा झाला राणा
बाळ व्हटामंदी चिमणा
चिमणा घास तुम्ही घ्या ना

खेळा बागडा हुंदडा
घर गोकुळाचा भास
दुधावरल्या सायीची
आजी जीवाला ही आस

दि.१२/०१/२०२४
सकाळी ०९.५८ वा.



## (३७)
## तो चंद्रमा खुशीत

तो चंद्र का झुरावा
वेडा नभात सांगा
कोणीतरी तयाला
सखी काळजास बांधा

मोजू दे ठोके तेथे
आहे का नाव त्याचे
चुकला कधी जरी तो
कळणार त्यास त्याचे

राहू दे थोडे तेथे
गावी मनाच्या त्याला
सखी अंतरात शशी का
इतका प्रसन्न झाला

डोकावताच तेथे
वेगात स्पंदनेही
झाली सखी मनाची
जुळली पुन्हा मनेही

आता न झुरतो कधीही
जातो तिच्या कुशीत
असतो म्हणून आता
तो चंद्रमा खुशीत

दि.१३/०१/२०२५
रात्री १०.०२ वा.



## (३८)
## हरवून गेली राधा

झाली कसली सावळबाधा
वेडी झाली राधा
तिचे तिला ना भान कोणते
हरवून गेली राधा

दिसे तिलाऽऽऽ जेथे तेथे
कृष्ण प्रियाचे बिंब
भावसरितेतून होतसे
राधा वेडी चिंब

कुठे किनारा तिला न माहीत
जाते वाहत राधा
मिसळून जाण्या मोहनसागर
अधीर भेटण्या राधा

स्वर वेणूचे कुठून येती
उगाच कानावरती
किती हलविले हाका दिधल्या
येई न भानावरती

कैशा जुळल्या कुठल्या तारा
धुंद होतसे वारा
नाही तनाचा नाही मनाचा
आत्ममयूर पिसारा

दि.१४/०१ /२०२५
रात्री ११.४३ वा.



## (३९)
## ऋणानुबंधांच्या जुळलेल्या

टकमक टकमक बघता पिलांनो
म्यांऊ म्यांऊ कशास ओरड
दूध पाहिजे असे तुम्हाला
पडेल घशाला कोरड

कान टवकारून काय ऐकता
बसा जरासे ऐटीत
कशास घुसता खोक्यामध्ये
अडगळीत व पेटीत

चंचल चंचल चाल चपळ की
दुडूदुडू घरभर धावून
गोंधळ तुमचा चाले निरंतर
लपता कोचाडी जाऊन

ना थकता तुम्ही कधीच कैसे
भावंडे खोडकर
परस्परांमध्ये खेळुबागडून
करता नखांची खरखर

करमत नाही तुमच्या विना रे
घर भरलेले राही
ऋणानुबंधांच्या जुळलेल्या
तारा जन्माच्या काही

दि १५/०१/२०२५
रात्री १०.२३ वा.

## (४०)
## वयात येताना...

वयात येताना... कळते ना काही
वळते ना काही... वयात येताना

वयात येताना... स्वप्नं उडत येती
पंख फुटून जाती, वयात येताना...


वयात येताना... मुठीत जग येते
कवेत नभ घेते, वयात येताना...

वयात येताना... कळी उमलू पहाते
फूल हसून जाते, वयात येताना...

वयात येताना... वय धोके देते
ठोके चुकवीते, वयात येताना...

वयात येताना... मन पाखरू होते
फुलपाखरू होते, वयात येताना...

दि. १७/०१/२०२५
रात्री ११.५४ वा.



## (४१)
## राधा मागणे वारंवार

श्याम रंगाच्या याच फुलांनी
मन माझे बावरले
गुंतून गेले श्यामल वेळी
ते न पुन्हा सावरले

पुन्हा पुन्हा मी पाहत होते
सावळ्यस जणु येथे
कुठे कुठे मी पाहू त्याला
पाहीन जेथे जेथे

रंग कोणता संग कोणता
नको दुजे मज काही
एक श्रीहरी व्हावा माझा
राधा मनी तो राही

चिंतन त्याचे अविरत चाले
चाले ध्यान नित त्याचे
कणकण त्याने गेला भारून
जीवन झाले त्याचे

म्हणून आता नुरली राधा
उरला नंदकुमार
एकरूप हो जन्मोजन्मी
मागते वारंवार
राधा मागणे वारंवार

दि.१६/०१/२०२५
सायं ०७.२५ वा.

## (४२)
## कधीच नाही ना

कळी उमलताना कळते का
कधीच नाही ना...
दव गळताना कळते का हो
कधीच नाही ना....

गंध जन्मतो परागकोशी
कोण भरतो पाही ना
बीजामधला वृक्ष दिसतो का
कधीच नाही ना...

कोण ढगातून भरतो जळाला
तो जीवन वाही ना
कोण अन्नपाण्याविन राहे
कधीच नाही ना...

प्रकाश मिळता मार्ग आकळे
दिशा उजळ दाही ना
श्वास मोजता येतील कोणा
कधीच नाही ना...

कोण आतला आवाज होतो
कोण हृदयी राही ना
आत पाहिल्याविना कळेल का
कधीच नाही ना....

दि.१८/०१/२०२५
पहाटे ०४.३३ वा.

## (४३)
## जन्म माझा शब्द वेडा

कोणत्या शब्दात मांडू
भावनांचे हे पिसारे
मोर खुलतो नाचतो अन
हृदयी उठती हे धुमारे

शब्द माझे मित्र तरीही
शब्द कुंठित कधीतरी
शब्द बोलून सांगतात नि
मौन धरती कधीतरी

शब्द येती संगतीला
म्हणून शब्दांची परी
शब्द माझे सोबती अन्
साथ देती ते खरी

शब्द शब्दांच्या खुणांना
शब्द होऊन मांडते
शब्द बनुनी रुधिर वाहती
शब्द सुरभी सांडते

शब्द वेडे की शहाणे
शब्द लाटा की तराणे
शब्द माझी स्पंदने अन्
शब्द शब्दांचेच गाणे

आज माझे शब्द घे तू
ऐकुनी कवितेतले
शब्द माझे सार व्हावे
येथले अन तेथले

जन्म माझा शब्द वेडा
शब्द मोगरी केवडा
शब्द दे आधार मजला
शब्द हृदया एवढा

दि.१८/०१/२०२५
रात्री १०.४७ वा.

## (४४)
## दुधावरची साय

माया जेंव्हा रूप घेते
साकारते माय
तिच्या वात्सल्याचे स्तन्य
दुधावरची साय

वासराच्या ओढीलागी
हंबरते गाय
तिचे मूक काळीज हे
दुधावरची साय

घरट्यात पिल्लं
चोचीमध्ये दाणा जाय
पक्षिणीचे प्रेम होई
दुधावरची साय

कासवीच्या नजरेनं
पिल्लं वाढताय
पोसते ती पाहताना
दुधावरची साय

ऋण कसे फेडणार
दुधाचे कोणी
अमृताची ठेव आई
ठेव संभाळोनी

सायीसाठी दूध मंद
आचेवर तापवा
माय कशी कुणी तिच्या
सारखे दाखवा

काही नका मागू दुजे
धरा तिचे पाय
आई म्हणजे जिव्हाळ्याच्या
दुधावरची साय

दि.१९/०१/२०२५
रात्री ११.५३ वा.

## (४५)
## स्पर्श लाभू दे मांगल्याचा

विसरून जाऊ सारी कटुता
मनात कसल्या भिंती बांधता
मधुर होऊ दे आठवणी अन
गोड होऊ दे अशी सांगता

चुकले झाले गेले जाऊन
मिळू दे पावन त्या गंगेला
पुन्हा नव्याने सुरू होऊ दे
आयुष्याचा खेळ रंगेला

नकोच गाठी राग द्वेषाच्या
खुणगाठी जरा घट्ट बांधू या
उसवून उखडून गेल्या जागी
प्रीत धाग्यांनी वीण सांधू या

स्वच्छ ठेवू मन दर्पण विमल हे
अर्पण सारे ईश्वर चरणी
करू समर्पित जे जे करणे
कर्म चांगले उदात्त करणी

क्षणाक्षणाला आशीष त्याचे
कणाकणाला गंध तयाचा
नको येथली पापी गठडी
स्पर्श लाभू दे मांगल्याचा

दि.२०/०१/२०२५
रात्री १०.२५ वा.

## (४६)
## सोबत करते परिस्थिती ही

परिस्थितीच्या भोवऱ्यात जी
अडकून पडती माणसे वेडी
कशास जखडून घ्यावी निष्फळ
परिस्थितीची लगाम बेडी

जन्मापासून सभोवताली
सोबत करते परिस्थिती ही
इथली नसते पूर्वकहाणी
संचित घेऊन परिस्थिती ही

कधी ती होते वरचढ आणिक
वरचष्मा हा तिचाच राही
जरा आंजारून घेत गोंजारून
आपुल्या नियंत्रणी ठेवून पाही

बदलत जाते स्थिर ना राहते
म्हणून स्वीकारावी तिजला
शरण न जाता तिला बदलण्या
हिम्मत ठेवावी गाठीला

खरे सांगते पदोपदी ती
साथ सोबती सखी वाटते
रोज नव्याने तिला भेटता
मला नित्य नव पुन्हा वाटते

तिच्या कुशीतून घेऊ बांधून
आनंदाचे क्षण मोलाचे
जे जे येईल जगून घ्यावे
अन बदलावे काय हवे ते

दि.२१/०१/२०२५
सकाळी ०८.५८ वा.



## (४७)
## वाट माझी वेगळी रे

वाट माझी वेगळी रे
सांग तुजसी रुचेल का
छेदल्या वाटा जुन्या त्या
बोल तुजला पचेल का

वाहिले मी हृदय आहे
भावना कळतील का
शब्द ऐकून अर्थ सारे
तुज मना वळतील का

या इथे मी थांबलेली
तू जरा वळशील का
देत माझे प्रेम मजला
रीत तू पाळशील का

ज्या खुणा सोडेन मी
त्या पदखुणांना पाह ना
तुही माझ्या सोबतीने
काळजाला वाह ना

गहिऱ्या असू दे त्या तुझ्याही
भावकुसुमी पाकळ्या
उंच असू दे अन भराऱ्या
हिंदोळ्यावर मोकळ्या

दि.२३/०१/२०२४
रात्री ११.४८ वा.




## (४८)
## जिथे दुरावला सखया माझा

का उगाच छळती स्मृती एवढ्या
निरोप तू घेताना माझा
पाय कुठून हा अडतो तेथे
जिथे दुरावला सखया माझा

मग रेंगाळते मीही तेथे
जेथे हसलो बसलो उठलो
एक मनाने स्वप्नामध्ये
सुसाट दोघे धावत सुटलो

पट सरसरतो नजरेपुढती
मधुर क्षणांचे ओवून मोती
कुठल्या शपथा कोणती वचने
जीव दोन एकरूप होती

असे वाटते सदा असावी
संगत सोबत आपुल्या जनाची
तळमळ तळमळ चालत जाते
घालमेल वाढते मनाची

नको दुरावा वाटत राही
मनास होती भासही काही
दूर दूर कुणी आपुले जाता
सुन्न वाटती दिशाही दाही

दि.२४/०१/२०२५
रात्री ११.०० वा.



## (४९)
## फुलराण्यांनो सांगा

कशास हसता खुशीत आपुल्या
फुलराण्यांनो सांगा
किती देखण्या लेऊन घेता
अंगोपांगी रंगा

स्पर्श कोवळे मृदू मुलायम
तुमचे हवेहवेसे
गालावरूनी फिरे स्वप्न की
वाटे काही तलमसे

आकारांच्या कथा कुणी ह्या
आणि कितीक सांगाव्या
फुलराणीच्या नित्य नव्याशा
रूपापुढे भुलाव्या

मुकुट कोणता सांगू का ग
सखे पुष्पीनी राणी
गंध आंतरिक तुझा दरवळे
मन हे पाणी पाणी

तुला पाहता दुःख विसरते
लहरून ये चैतन्य
काही नको मज देवा करावे
नित्य कुसुमा अनन्य

दि.२५/०१/२०२५
रात्री १०.४८ वा.



## (५०)
## श्री विष्णू परमेशा

नमन घ्यावे श्रीनारायणा हो
श्री विष्णू परमेशा
विश्वपालका तारणकर्त्या
दुरीते हार विश्वेशा

ब्रह्म्याची तू उत्पत्ती अन
तूच लक्ष्मी रमण रे
त्रैलोक्यातून तुझी अर्चना
तूच कर्ता करणं रे

युगायुगातून अवतारांनी
पावन करिशी वसुधा
मुखी दाखवून ब्रह्मांडाला
तृप्त झाली यशोदा

श्रीरामाच्या आदर्शाचे
रामराज्य हे असावे
मनी दाटते अशी कामना
रूप सदाची दिसावे

सहस्रनामावली तुझी या
देहा करते शुद्ध
आत्मलीन मी होते देवा
आत्मज्ञाने प्रबुद्ध

दि.२६/०१/२०२५
सकाळी ११.४१ वा.



## (५१)
## अशीच पालवी

संपलेल्या वाटांना
कधीतरी वाट फुटते
तसेच कोणीतरी
भेटते

बघ ना....
पुन्हा तिथे सांज
पुन्हा पहाट
वाटते

वठलेल्या काळजाला
फुटलेले पाझर ओले
भावनांचा अंकुर
डोले

वाढलेला गुंता
भेडसावत जाणाऱ्या चिंता
एक आशाकिरण
उगवलेला

अशीच पालवी
रोज फुटते मनाला
साथ क्षणाक्षणाला
अनमोल

दि.२८/०१/२०२५
रात्री १०.४२ वा.



## (५२)
## तूच संजीवनी

केशकुंतली गुंतलेला
मी तुझा वेडुला
मोगऱ्याच्या गजऱ्यामध्ये
गंध दरवळलेला

अंबाड्यातून डुलते सुंदर
फूल कांचनी देखणे
मी तर त्याच्या नक्षीमधुनी
स्वप्नाला बघ रेखणे

साज तुझा मज भुलवीत जातो
नित्य नेमाने साजनी
तूच नवी तू नवी नवेली
रोज उमलते मज मनी

तुझीच वसने तुझीच वचने
तुझे चालणे मोहिनी
तुझे राग अनुराग रागिणी
तूच जीवना संगिनी

एक झलक दिसताच हवीशी
पुन्हा भाळतो राणी
क्षणाक्षणाला माझ्यासाठी
तूच संजीवनी
भाविनी तूच संजीवनी

दि.२९/०१/२०२५
रात्री ११.५४ वा.



## (५३)
## सांगू कसे श्रीरंगा

मी दंग दंगते ना
तुज रंगी रंगते ना
सांगू कसे श्रीरंगा
तुजसंग संगते ना

बुडते सुरात वेणू
मज अंतरात वाजे
वाकून पाहते तर
हृदयात तूच साजे

बघ आसमंत सारा
संमिश्र वाटतो हा
कोठे तो वाटे राधा
कोठे नि सावळा हा

बुडतो रवी तरीही
थोडा थबकतो आहे
पाहण्यास प्रीत आपुली
किंचितसा थांबताहे

वेड्या भरात सांज
रेंगाळते कधीची
नाती जुळून येती
आताची ना आधीची

दि.३०/०१/२०२५
सकाळी ०६.३७ वा.



## (५४)
## नयनसूख कोणते कळावे

पिवळ्या धम्मक रंगामधली
उधळण पाहून घ्यावी
नयनसूख कोणते कळावे
मरगळ झटकून जावी

ही पाने की फुले उमलली
तरुवर कांचनपेठा
कुण्या अप्सरेचा हा वाटे
भूवर आला हेका

तिच्या आभूषणसेवेसाठी
सुवर्णतरु साकारे
येथून वेडावून सोनेरो
होत वाहती वारे

क्षणात वाटे कुणी उधळला
भंडारा उत्साहे
मनात काही आशा आणिक
स्वप्नं सुंदरी राहे

जरा विसावून मनात आता
सोन्याच्या आठवणी
पुन्हा पुन्हा मग करीत जावी
येथ मना पाठवणी

दि.३१/०१/२०२५
रात्री ११.३२ वा.



## (५५)
## प्रियवरा वळून पाहतो का

हे कुठले जडले नाते
कुठल्या ह्या रेशीमगाठी
कोठून वाटते कोणी
जन्मले आपुल्या साठी


सौंदर्य ओतप्रोतून
ईश्वरी स्पर्श ओतून
स्थळ काही उरती इथले
लावून ओढ आतून

बघ समोर पर्वत रांगा
लाजून धुक्यातून दडल्या
येथेच सरोवर काठी
जवळीकता आपुल्या घडल्या

हलकेच चालते नौका
कधी उगाच चुकतो ठोका
मी अजून तेथे आहे
प्रियवरा वळून पाहतो का

क्षण सुंदर सुंदर इथले
लोचनात अलगद टिपले
चल पुन्हा पुन्हा जाऊनिया
पाहू जे चित्र मज दिसले

दि.२७/०१/२०२५
रात्री ११.३८ वा.



## (५६)
## प्रिया कृष्णवरा तूच ना....

का मिटले तू राधे डोळे
सांग जरा तू सांग ना
रूप तुझे मग साठवताना
आत बाहेर तूच ना
प्रिया कृष्णवरा तूच ना....


उगाच वाटे सत्य आहे की
श्याम तू नाझी कल्पना
वृंदावनी येतील कानी बघ
वेड्या काही जल्पना

राधे तुला न सोडीन कधीही
डोळे उघडे वा झाकता
जसा स्वर्ग सापडे नभाला
भुईवर अलगद वाकता

काही नाती कैसी जुळती
उत्तर कोणी द्यावे
ओंजळीत जे दान मिळाले
सार्थक होऊन जावे

असेच राहील नित्य निरंतर
प्रेम आपुले गहिरे
ना देहाचे बंधन अथवा
ना जन्माचे फेरे
ना जन्माचे फेरे.....

दि.०१/०२/२०२५
सकाळी ०६.१९ वा.



## (५७)
## तूच साहित्य ईश्वरी

तूच भारती वाणी जननी
तूच माते सरस्वती
वसंत पंचमी शुभदिनी झाली
शारदे देवी तव उत्पत्ती

हंसवाहिनी जगती ख्याता
तूच पूज्या वागीश्वरी
तूच शब्द अन अर्थ जागृती
तूच साहित्य ईश्वरी

कुमुदी म्हणती तुज काहीजण तर
काही वदती ब्रह्मचारिणी
बुद्धिदात्री तू प्रज्ञा मेधा
प्रतिभेची ग वरदायिनी

तेजस्विनी तू चंद्रकांतीयुता
तूच शब्दब्रह्मांडिनी
भुवनेश्वरी तू अर्थ सार्थकी
शक्तीयुता तू प्रचण्डिनी

जिव्हाग्रावर वसशी माते
नित्यरूपा ब्रह्मवादिनी
तुझ्या कृपेने जन्म फळावा
तूच परमार्थसाधिनी

दि.०२/०२/२०२५
सकाळी ०९.४७ वा.



## (५८)
## दिशा उजळता ज्योती पसरते

लाल लाल मनमोह रक्तिमा
सुंदर शोभा सूर्याची
रोज प्रभाती उधळण होते
अनंत असल्या तेजाची

कळ्या उमलती फुले डोलती
चैतन्याची पखरण
दिशा उजळता ज्योती पसरते
नित्य नवी प्रभा पसरण

रोज निशेला जाग्या होती
अंधाराच्या त्या राण्या
रविकिरणांच्या उगवणी संगे
निद्रा आळवती गाण्या

कोण सकाळी दे संदेशा
उठा उठा हो जागे व्हा
दिनचर्येच्या आरंभाला
ईशस्मरणी दंग रहा

कर्म करावे असे अखंडित
रविराजा जसे नियमित
कोण थांबवू शकेल कीर्ती
लाभेल ख्याती जी अमित

दि.०३/०२/२०२५
सकाळी ०८.४२ वा.



## (५९)
## वसुंधरा यौवनात

वसुंधरा यौवनात
येते वसंतात ती भरात
कुहू कुहू कुजन करून कोकीळ
गाईल मधुर स्वरात
नवीच स्वप्ने जागी मनात
येते वसुंधरा यौवनात...

नव्या पालवीसंगे फुटतील
कोंब नव्याने धरतीला
रंग आगळे ढंग वेगळे
चढतील गंधित मातीला
नवीच स्वप्ने जागी मनात
वसुंधरा यौवनात..

परिमळ सुंदर पसरून जातील
फुले दिव्यशी उमलून जातील
नवी चेतना नवी प्रेरणा
नव आकांक्षा हृदयी राहतील
नवीच स्वप्ने जागी मनात
वसुंधरा यौवनात..

हिरवा हिरवा कंच शालू ती
अंगावरती लेऊन शोभे
ऋतुराजाच्या आगमनाने
लहर चैतन्याची गाजे
नवीच स्वप्ने जागी मनात
वसुंधरा यौवनात..

मऊमऊ हिरवा दिसे गालिचा
हरिततृणांच्या मखमालीचा
पाचू सांगा कुणी अंथरले
सूगंध हुंगुन घ्या मातीचा
नवीच स्वप्ने जागी मनात
वसुंधरा यौवनात..

दि.०४/०२/२०२५
सकाळी ०४.५८ वा.

## (६०)
## संधी मिळेल केंव्हा

भेटू पुन्हा नव्याने
विसरून काय झाले
सांगा कितीतरी हो
वेळेस मनी आले

पण आडवे येते काही
कधी भाळ लिखिते ती का
बोलावया न धजती
मग माणसे अशी का

राहती मनात सारे
केले विचार वेडे
मग सोडवू शकेना
फिरते उगाच कोडे

शब्दास कोठे तोटा
तरी शब्द खर्चीतो ना
इकडे अजीव दगडा
परि नित्य अर्चितो ना

जे जे नि जेंव्हा जेंव्हा
येईल मनात तेंव्हा
बोलून घेत जावे
संधी मिळेल केंव्हा
नंतर संधी मिळते न केंव्हा

दि.०६/०२/२०२५
सकाळी ०८.३२ वा.



## (६१)
## वाटा जुनाट झाल्या

सांगा कसे स्मरावे
कोठून दिशा आल्या
ना आठवावे काही
वाटा जुनाट झाल्या

केंव्हातरी मी गेले
चालून रोज जेथे
आता अनोळखी का
दिसतात मार्ग येथे

वळणे नवी नवी अन
रस्ता गुडूप झाला
बुडताच पायवाट
पायंडा नवा हो घाला

नुसता न राही मार्ग
ती राजमार्ग ठरतो
कधी ओळखीचा नाही
तो मार्ग स्मृतीत उरतो

असते खरेच हाती
का आपुल्या जात रहाणे
फिरुनी पुन्हा कधी ते
कोठून कोठे जाणे

दि.०५/०२/२०२५
रात्री १०.२६ वा.



## (६२)
## घर वेगळे नकोच सजणा

निसर्ग देतो साद मागतो
प्रतिसादाला आपुल्या
जीवन करतो सुरम्य सुंदर
गोष्टी देऊनी भल्या भल्या


रंग पिसारे खुलवून सारे
रंग रंगीले करतो स्वप्ना
कधी वाटते आई तो तर
कधी बाप कणखरसा कणा

जलतरंग उठतात हलकेसे
हलक्या हलक्या सरी बरसती
चातक वेडे प्रेमापोटी
मेघधारांसाठी तरसती

गवतावरच्या फुलराण्यांशी
हितगुज साधून घ्यावे थोडे
फूलपाखरांच्या संगे मग
गुंजन व्हावे गोडे गोडे

घर वेगळे नकोच सजणा
इथेच राहू कुशीत सृष्टीच्या
फिटतील साऱ्या पारणवेळा
नव्या उघडतील झडपा दृष्टीच्या

दि.०८/०२/२०२५
रात्री ११.३४ वा.



## (६३)
## उदित जाहल्या श्रीनारायणा

उदित जाहल्या श्रीनारायणा
प्रणाम तुजला आहे
सप्तश्वांच्या रथी विराजित
तेजप्रभा मग पाहे

कसे कधीही नाही थकणे
चालत जाशी नित्य
जगतासाठी तुझीच ऊर्जा
चक्षूंसाठी सत्य तू देवा
चक्षूंसाठी सत्य

सस्य वाढते जीव पोसती
प्रकाश पडतो ढवळा
अंधाराची कशास मग हो
तमा कुणाला बोला

एकामागून एक चालती
सात वासर जे वार
सप्ताह असो की पक्ष मास ते
संवत्सर काळ धार

रोज पहाटे तुला स्मरावे
तसेच सायंकाळी
इथे तू बुडतो क्षितिजापाशी
तिथे दिसशी की सकाळी

दि.०९/०२/२०२५
सकाळी ०७.३९ वा.



## (६४)
## जिथे कृष्ण माझा ही राधाही तेथे

कितीदा तुला मी मला रे वहावे
तुझ्या लोचनी रूप माझे पहावे
तुला सांगते कृष्ण दामोदरा रे
तू माझ्या मी तुझिया मनी नित रहावे

तू माझीच आहेस सखी प्रियतमा गे
राधे तुझ्याविण सुना आतमा गे
तू माझीच साथी सदा संगिनी गे
तू अर्धांगिणी मोहिनी मज रमा गे

कसे सांगू रंगात न्हाते श्रीरंगा
उगा मांडतो तूच हृदयात दंगा
किती जन्म रे युगयुगांची कहाणी
तुझ्या मागते नित्य देवा मी संगा


अशी लाभता धन्य मी रागिणी गे
तू माझी नि माझी मृदुल मानिनी गे
तुझ्या माधुरीने मी आकंठ बुडतो
संजीवनी तूच मज तारिणी गे

असे सौख्य देणे तुला प्रीत होऊन
नव्याने मी जगणे नवी रीत होऊन
मी धारा जराशी उलट वाहणारी
तू राधा म्हणावे मला चिंब होऊन

तुझ्या प्रीतीसाठी मी विसरून सारे
विश्वात मांडून नव्याने पसारे
मनमोर नाचे कसा आत्मरंगी
खुलतात त्याचे तुझ्याने पिसारे

अनुरूप जोडी तुझी माझी येथे
जिथे कृष्ण माझा ही राधाही तेथे
कुणी शोधतील धागे कुठले कधीचे
जिथे स्वर्ग थोडा हे नाते आधीचे

दि.१०/०२/२०२५
रात्री ११.४३ वा.



## (६५)
## सखे तू... सोनचाफ्याची खणी

पुन्हा धाडीला तू सोनचाफा
दरवळला मज मनी
गूज जाणिले कुणी सख्या रे
गूज जाणिले कुणी

परागकोशी तुझ्या स्मृती रे
सापडल्या धुंडुनी
आठव आली जुनी सख्या रे
आठव आली जुनी

बंद पाकळ्या उमलल्या कळ्या
रंग सोनेरी गुणी
पिघळली खाण कुणी कांचनी
खाण कुणी कांचनी

स्पर्श सांगतो हर्ष फुलवितो
क्षणात तनी अन मनी
दिले मी प्रिया तुजला वाहुनी
मला रे दिले तुला वाहुनी

तुझी नि माझी हाच जाणतो
गंधमिठी साजणी
तू माझी सोनचाफ्याची खणी
सखे तू... सोनचाफ्याची खणी

दि.११/०२/२०२५
सकाळी ०७.५७ वा.

## (६६)
## नवी वाट रोज घ्यावी

दिसल्या नव्याच वाटा
किरणे नवी पसरली
खुलवून जीवनाला
मग वेदना विसरली

झाली पहाट झाली
जगतास जाग आली
विरले गडद तमाचे
जाळे उतरले खाली

प्राची प्रसूत होता
कांतीचा जन्म होतो
सविता हे नाव ठेऊन
नभराज तात होतो

हा सोहळा प्रतिदिन
चाले दिगंती तेज
सांगा असेल कोण
देवाहुनी तरबेज

वाटे म्हणून मजला
नवी वाट रोज घ्यावी
चैतन्य पियुष धारा
नवं नवेली नित प्यावी

दि.०७/०२/२०२५
रात्री १०.४९ वा.



## (६७)
## तुझा हात हाती सखे राधिके ग

तुझा हात हाती सखे राधिके ग
जरा हिंदोळ्यावर झुलू ये इथे
असे मिटले डोळे तुझे आणि माझे
नव्या विश्वी गेलो पहा त्या तिथे

वसन सोनेरी कांचनी स्वप्न झाले
पहा त्या तिथे पुष्प उमलून आले
तुझ्या केशसंभारी डुलले कुसुम जे
सुरभीत नहाण्या भृंग गोळा ते झाले

ही पुष्पमाला जी रुळते तनुवर
तुझी आस तिजला छबी मज मनावर
तुझे हास्य देते अशी तृप्तता की
उमटते हसू येथ माझ्या मुखावर

असे वाटते स्वर्ग येथे हा झुकला
धरा उंच झाली नि टेके नभाला
अशा पोकळीतून झुलतात काया
हा कसला दिलासा मिळे मज मनाला

अशी राहो कायम तुझी माझी प्रीती
हा अनुराग आपुला अनोखी ही रीती
असे क्षण हे आपुले रेखून रहावे
वेणूत स्वर आपुली गुंजाळ गीती

दि.१२/०२/२०२५
रात्री ११.५७ वा.




## (६८)
## कृष्णप्रीतीची रास

थांब मुरली तू जरा पहुडली
राधा सांजेसवे
एक सूर बघ झाले आमुचे
गीत उमटले नवे


कुठे सांडला रंग पिसारा
आकाशाच्या शिरी
निळसर भासे सायंकाळी
मेघाच्छादित गिरी

चंद्र चांदण्या स्तिमित जाहल्या
राधा रूप पाहुनी
श्याम सावळा राधा प्रेमे
गेला की हरवुनी

मीलन झाले आत्मरूपाचे
ती मी मी ती एक
किती चाललो युगे न माहीत
क्षण दवडले अनेक

असेच जेंव्हा कुणी भेटतील
राधेश्याम हो भास
अविरत चाले ओढ लागूंनी
कृष्णप्रीतीची रास

दि.१३/०२/२०२५
सकाळी ०७.२९ वा.



## (६९)
## साथ जन्माची सात जन्म दे

फुलासारखे जपशील मजला
काय अधिक मागणे
मनात कायम ठेव सख्या तू
प्रीत माझी सांगणे

बांधून घेईन सेतू किती मी
तुला मला सांधण्या
अविचल राहील प्रेम आपुले
अढळ जणु चांदण्या


असा दिलासा वाटे मजला
वाट तुझ्यासवे चालून
साथ जन्माची सात जन्म दे
पुन्हा माझ्यावर भाळून

भाळी लिहिल्या संचित ओळी
त्यात तुझे रे नाव
मनात माझ्या तुझ्याविना ना
कुठला वसतो गाव

क्षणाक्षणाला हवीहवीशी
तुझी कामिनी होईन
जणू सावली तशी सोबती
सदैव राजा राहीन

एक वचन दे मनापासुनी
मनी मला तु स्मरुनी
नित्य चालशील सोबत माझ्या
कर हा हाती धरुनी

दि १४/०२/२०२५
सकाळी ०८.३९ वा




## (७०)
## प्रभातवेळी किरणशलाका

प्रभातवेळी किरणशलाका
येतील बघ भूवरी
स्वर्ग सापडे तेजामधुनी
हर्षित हो शर्वरी

झाडावेलींच्या गाळणीतून
गाळून येतो रवी
नव्याच ढंगामध्ये उजळते
अंधारी ही अटवी

हास्य उमटले जणू इंद्राचे
की चांदणे चंद्राचे
जरा उजेडी वातावरणी
गगनी रंग मंद्राचे

निळसर सुंदर छटा पसरती
मन निळसर जणु श्याम
रोज सकाळी येशील सखया
होऊन तू अभिराम

एक प्रेरणा एक चेतना
कुणी पाठवली पहा
सौंदर्याची परिभाषा ही
लोभसवाणी अहा

दि.१५/०२/२०२५
सकाळी ०७.४२ वा.

# लेखिकेचा परिचय


- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**

  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक – संस्कृत)

  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर – ४०० ००५

  ई–मेल : dr.manjushak@gmail.com

  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४


**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली.** **(https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२० प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित ''वैदिक साहित्याचा इतिहास'' (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा:** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

‘‘**साहित्यिक व्रत**’’ म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील ‘हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’ मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक ‘विवाह संस्कार’ २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्याय:, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर ‘प्राचीन भारतीय समाज’, ‘सूर्य शक्ती और मानव’, ‘कौटिलीय अर्थशास्त्र’, ‘स्मृतीग्रंथ – भाग १ और २’ ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

  त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा – नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी

अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), मृद्‌गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी–जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड–गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग–निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा, सृष्टीगंध, युगंधरा (निसर्गावरील कविता), नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश (देवभक्तीपर), मंगेश, आंदण (प्रासंगिक), रूप–स्वरूप, श्रीरंग (राधाकृष्ण), अलवार, मधुश्री, सहा सोहळे (ऋतू), सुधांशु (चंद्र), दिव्यांतरी (सूर्य), बकुळफुले, अळुमाळु, सुरभी, कामिनी (फुलांवरील कविता), खाणाखुणा (पशु), वैष्णवी (पक्षी), नादश्रुती, श्वेता (तिच्यावरील प्रीत कविता), स्वामिनी (स्त्रीजीवन – भाग १), मृणालिनी (स्त्रीजीवन – भाग २), प्रमिला (धरती–आकाश), लाघव वेळा (सकाळ–संध्याकाळ), मनमंदिरा, तेजशलाका, उदय, मंजुभारती (जीवनपर कविता), प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर (त्याच्यावरील प्रीत कविता), मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी (ललितलेख), बोल बरवे, मनस्विनी, हृदयस्पर्शी (रसिक प्रतिक्रिया – कवीश्वर), प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (अन्य रसिक प्रतिक्रिया), गंधराणी (मिश्र कविता), श्रावणी (पाऊस कविता), उल्का (गझल), तेंव्हा (वेळा), नभ मोजताना (धरती–आकाश), जरा रेंगाळले (वाट), रंगतनु, कृष्णकांत (रंग), कविता माझी (सर्वोत्कृष्ट कविता), कवडसा, मृण्मयी, अबोली, अनावर मना, मल्मली, अक्षरा (मिश्र कविता) यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग–१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात – डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये 'मंजु मंजिरी' आणि 'सर्ग निसर्ग' नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके –**

(मिश्र कविता) – अनुरंग, नवीनवेली, मन ओथंबुन गेले, उमलवाट, दरवळ तुझे नि माझे, लोभसवाणी, (मन) मनमनुल्या, वेध मनाचा, शब्द पाखरा,

मन मोहरून माझे, (अध्यात्म) – निरव नमन, (जीवनपर) – क्षणांचं देण, आयुष्याचं गाव, (फुल) – फुललेलं मौन, (निसर्ग) – सुख सुखाचं, पानापानातली कथा, (प्रीत त्याची तिच्यासाठी) – स्पंदन रेषा, (सुख–दुःख) – सुखाचा किनारा, (नानी) – थांब जरा तू, (गंध–सुगंध) – दूर त्या तिथे, आनंद गंधपाणी, (स्त्री जीवन) उडण्या हे आभाळ, संस्कृत बालगीत संग्रह – बालमोदिनी, सुधा मूर्ती यांच्या 'तीन हजार टाके' या मराठी पुस्तकाचा संस्कृत अनुवाद – त्रिसहस्रसीवनम्, सुधीर शास्त्री यांचा मराठी काव्य संग्रह 'मनुष्य' या पुस्तकाचा संस्कृत अनुवाद – मनुष्यः, शब्द तुझ्या नावाचे, घडते नवेच काही.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२–२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान – २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार – २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर – ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१

- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल-साहित्य पुरस्कार २०२९
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८
- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री<br>मुलाखत,<br>दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source =whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialshare buttons |
| ३ | ''आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे.'' साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/maha_governor/status/ @maha_governor 1439559856764030979 ?s=08 <https://twitter.com/maha_governor/status/1439559859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान 'प्रकाशवाटा' या डॉ. प्रकाश आमटे यांच्या आत्मचरित्राचा संस्कृत अनुवाद डॉ. कुलकर्णी यांनी 'प्रकाशमार्गा:' | https://www.loksatta.com //lokrang/sahitya-akademi-award-for-translation-autobiography-of-prakash-amte-poet-prof-dr-manjusha-kulkarni-prakashwata-zws-70-2612674/lite/ ?utm_source=whatsapp_web&utm_medium=social&utm_campaign=socialsharebuttons |
| ७ | https://mr.wikipedia.org | https://mr.wikipedia.org/wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी यांचा महाराष्ट्र राज्याच्या मा. राज्यपालांच्या हस्ते अभिनव साहित्यिक विक्रम केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com MahaGovtMic/status 1476551366352924672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार 'साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला' भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/InfoVidarbha/status/1418559733921816580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर डॉ. मंजूषा कुलकर्णी सखी सह्याद्री - डीडी सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/ITLxInwuJc ; https:/youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह डॉ.मंजूषा कुलकर्णी / नवरात्री स्पेशल / सकाळ मीडिया | https://youtu.be/m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची<br>फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/<br>story.php?story_fbid=1266<br>533350529198id=10001517<br>6343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची<br>फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/<br>story.php?story_fbid=<br>4429100480484776<br>id=100001546044035<br>sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम –<br>''सर्ग_निसर्ग'' ऑडिओ<br>अल्बम – ''मंजुमंजिरी'' | <https://vy6s8.app.goo.gl/<br>NKnJ><br>https://vy6s8.app.goo.gl<br>/A8Z5 |
| १८ | Special Screening of<br>100th Episode of<br>Mann Ki Baat from<br>Raj Bhavan | https://www.youtube.com<br>/live/7-dyWQaLA?si=mid<br>7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद<br>व्याख्यान : भाग – १ | https://youtu.be/TrNMBV_<br>ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद<br>व्याख्यान : भाग –२ | https://youtu.be/NpvMk-<br>Pu4dOs?si=typfHtOvNg-<br>1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : १०५
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : २७
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

● ● ●